लोकसत्ता पा. १ व ४

# संजय वर्मा नवे पोलीस महासंचालक

## निवडणूक आयोगाच्या मान्यतेनंतर नियुक्ती

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने वरिष्ठ पोलीस अधिकारी रश्मी शुक्ला यांना राज्याच्या पोलीस महासंचालकपदावरून हटवून त्यांच्या बदलीचे आदेश दिले होते. त्यानंतर, मंगळवारी निवडणूक आयोगाच्या मान्यतेनंतर संजय वर्मा यांची राज्याचे पोलीस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली. निवडणूक आयोगाने याबाबतचे आदेश काढल्यानंतर लगेचच वर्मा यांनी कार्यभार स्वीकारला.



विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेचे काटेकोर पालन होईल. पोलिसांच्या भूमिकेबद्दल कोणालाही संशय व्यक्त करण्याचा वाव राहणार नाही. समाजकंटकांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण मिळणार नाही. त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. – **संजय वर्मा**, पोलीस महासंचालक

### रश्मी शुक्लांचे भवितव्य नव्या सरकारच्या हाती



मुंबई : निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पोलीस महासंचालकपदावरून हटविण्यात आलेल्या रश्मी शुक्ला यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले आहे. त्यामुळे शुक्ला याचे भवितव्य आता नव्या सरकारच्या हातात राहणार आहे. महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आल्यास त्यांची पुन्हा वर्णी लागू शकते. **पान ७**

वर्मा १९९० च्या तुकडीचे अधिकारी असून कायदा व तांत्रिक विभागाचे संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांनी कोल्हापूरमध्ये महानिरीक्षकपदाची जबाबदारीही सांभाळली होती. त्यावेळी कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाचे (एसआयटी) नेतृत्वही वर्मा यांनी केले होते. याशिवाय वर्मा चार वर्षे म्हाडाच्या दक्षता विभागात कार्यरत होते. त्यानंतर, पोलीस महासंचालक कार्यालयातही ते काहीकाळ कार्यरत होते. महासंचालक कार्यालयातून वर्मा यांची राज्याच्या कायदेशीर आणि तांत्रिक विभागाचे महासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. ते मूळचे उत्तर प्रदेशातील असून त्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रातून ***(पान ४ वर)***

# संजय वर्मा नवे पोलीस महासंचालक

***(पान १ वरून)*** शिक्षण घेतले आहे. एप्रिल २०२८ मध्ये ते सेवानिवृत्त होणार आहेत. शुक्ला यांची तातडीने बदली करण्यात यावी, त्यांच्याकडील कार्यभार सेवाज्येष्ठतेनुसार त्यांच्या नंतरच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे (मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर) देण्यात यावा आणि मुख्य सचिवांनी सेवाज्येष्ठता व योग्यतेनुसार तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांची नावे मंगळवारी दुपारी एक वाजेपर्यंत निवडणूक आयोगाकडे पाठवावीत, असे आदेश आयोगाने सोमवारी दिले होते. त्यानुसार, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या कार्यालयातून फणसळकर, संजय वर्मा व रितेश कुमार यांची नावे पाठवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. अखेर निवडणूक आयोगाने वर्मा यांच्या नावावर शिक्कामोर्तब करणारे आदेश निवडणूक आयोगाचे सचिव एस.के. दास यांनी काढले.

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पृ.पा १


# मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर धुळीचे साम्राज्य

## वाहनचालकांसह प्रवासी त्रस्त, उपाययोजना करण्याची मागणी

**लोकसत्ता वार्ताहर**

**कासा :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर सध्या काँक्रीटीकरण करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. ज्या ठिकाणी काम सुरू आहे त्या ठिकाणी समांतर कच्चे रस्तेसुद्धा तयार करण्यात आले होते. पाऊस थांबल्याने या कच्च्या रस्त्यावरील तसेच बुजविलेल्या खड्ड्यांमधून मोठ्या प्रमाणात धूळ तयार होत असून धूळ वाहनांच्या वर्दळीत, हवेमार्फत उडत असून त्याचा त्रास वाहनचालकांसह प्रवाशांना होत आहे.

राष्ट्रीय महामार्गावर काँक्रीटीकरण करण्याचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू आहे. या कामामुळे वाहतुकीला अडथळा येऊ नये यासाठी अनेक ठिकाणी कच्चे रस्ते तयार करून त्यावरून वाहतूक वळवण्यात आली आहे. ज्या ठिकाणी काँक्रीटीकरण करण्याचे काम सुरू आहे त्या ठिकाणी मजबुतीसाठी काँक्रीट केलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी टाकले जाते. या पाण्यामुळे हे रस्त्याच्या बाजूला चिखल तयार होत आहे. ज्या ठिकाणी काँक्रीटीकरण सुरू आहे त्या ठिकाणी केवळ एकाच मार्गिकेवरून वाहतूक सुरू आहे. त्यामुळे वाहनांच्या चाकांसोबत ही चिखलमाती संपूर्ण महामार्गावर पसरत आहे. आता पाऊस कमी झाल्याने ही चिखलमाती सुकली आहे. महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांमुळे ही माती मोठ्या प्रमाणात उडत आहे. तसेच थोडी हवा जरी आली तरी महामार्गावर मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य तयार होत आहे.



> राष्ट्रीय महामार्गाच्या काँक्रीटीकरणाचे काम वेगाने सुरु असून पुढील काही दिवसांत हे काम पूर्ण होईल. तरी महामार्गावर धूळ उडू नये यासाठी टँकरद्वारे वारंवार पाणी मारले जाते. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर धुळीची समस्या दूर होईल.
>
> **- सुमित कुमार**, व्यवस्थापक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण.

महामार्गावर धूळ आल्यामुळे अपघात होण्याची शक्यताही वाढली आहे. महामार्गावरून जाणाऱ्या दुचाकी चालकांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. दुचाकी चालकांच्या नाकातोंडात तसेच डोळ्यात ही धूळ जात आहे. महामार्गावरून पाचसहा किमी प्रवास केला तरी दुचाकीचालकांचे कपडे धुळीने माखून जात आहेत. तरी या धुळीवर काहीतरी उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी वाहनचालक करीत आहेत.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु. पा १.

# विरार-नालासोपारा लिंक रोड वाचवतोय स्थानिकांचा वेळ

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील विरार आणि नालासोपारा या दोन रेल्वे स्थानकांपासून अगदी जवळ असणारा लिंक रोड झाल्यामुळे या दोन स्थानकांना जोडणाऱ्या पश्चिम बाजू जवळ आल्या आहेत. वसई- विरार महानगरपालिकेकडून या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. विरार-नालासोपारा लिंक रोड झाल्यामुळे शहराच्या वाहतूक व्यवस्थेला चालना मिळून प्रवास आणखी सुलभ झाला आहे.

आज या रस्त्याचा वापर मोठ्या प्रमाणावर होताना दिसत असून यात नोकरीनिमित्त प्रवास करणारे, कामानिमित्त प्रवास करणाऱ्या महिला, शाळा-महाविद्यालयांत जाणारे विद्यार्थी, दोन्ही स्थानकांदरम्यान असणाऱ्या भाजी मंडईमुळे भाज्यांची वाहतूक करणेही यामुळे सोपे झाले आहे. तसेच हा रस्ता झाल्यानंतर रिक्षाचालकांकडून मोठ्या प्रमाणावर आनंद व्यक्त करण्यात आला.



### नागरिकांची चांगली सोय

विरार पश्चिमेच्या जकात नाका परिसरातून सुरु होणारा विरार-नालासोपारा लिंक रोड आता सोयीचा झाला आहे. हा रस्ता नालासोपारा पश्चिमेच्या लक्ष्मीबेन छेडा मार्ग येथे संपतो. म्हाडा वसाहत तसेच अनेक रहिवासी संकुलातून जाणारा हा रस्ता झाल्यामुळे या परिसरातील नागरिकांना दोन्ही स्थानकांकडे प्रवास करणे सोयीचे झाले आहे.

### वाहतूककोंडीमुळे प्रवाशांचा वेळ जात असे वाया

याआधी या दोन स्थानकांतील पश्चिम बाजूला जाण्यासाठी बोळींज मार्गे जावे लागत होते. मात्र, ते अंतर अधिक असल्याने प्रवाशांचा वेळ वाया जात असे. तसेच संध्याकाळच्या वेळी अनेकदा वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत असे. आता थेट सरळ असणारा दुपदरी रस्ता झाल्यामुळे इथली वाहतूक जलद झाली आहे तसेच त्यामुळे इंधनाचीही बचत होत आहे.

# आमिषाने ७ वर्षांच्या मुलीवर अत्याचार

## चॉकलेट-आईसक्रीम देतो सांगितले : नवघर पोलिसांत गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : एका सात वर्षाच्या मुलीला चॉकलेट व आईसक्रीम देण्याचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या २० वर्षीय तरुणाविरुद्ध नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील आरोपीचा पोलिस शोध घेत आहेत.

भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलिस ठाणे हद्दीत सात वर्षाची मुलगी आपल्या पालकांसह राहते. ती राहत असलेल्या परिसरात राहणाऱ्या २० वर्षीय तरुणाने ३ नोव्हेंबरच्या रात्री सव्वा नऊच्या दरम्यान तिला चॉकलेट व आईसक्रीम देण्याचे आमिष दाखवून तिला तो राहत असलेल्या इमारतीच्या गच्चीवर नेले. तेथे त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

'तुला जेवढा त्रास होतोय होऊ दे, तू उद्या पुन्हा आली की तुला आणखीन चॉकलेट व आईसक्रीम देईन', असे सांगून तो निघून गेला.

■ घडलेला प्रकार लक्षात आल्यावर मुलीच्या आईने ४ नोव्हेंबर रोजी नवघर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी आरोपी तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक धीरज कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक तुकाराम सुकुंडे हे तपास करत आहेत. या घटनेने परिसरात संताप व्यक्त होत असून, आरोपीला तत्काळ अटक करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# हॉटेल बाहेरून दुचाकी चोरीला

मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या महात्मा ज्योतिबा फुले क्रॉस मार्गावरील ब्लॉसम हायस्कूलजवळ न्यू जैन दर्शनमध्ये राहणारे नारायण गोपीलाल पुरोहित हे मीरा रोडच्या शिवार उद्यान समोरील रत्नागिरी हॉटेलमध्ये जेवायला गेले होते. त्यांनी त्यांची दुचाकी हॉटेल बाहेर सार्वजनिक रस्त्यावर उभी केली होती. जेवण झाल्यानंतर घरी जाण्यासाठी दुचाकी घ्यायला ते गेले असता दुचाकी दिसून आली नाही. याप्रकरणी नयानगर पोलिस ठाण्यात १५ हजार किमतीच्या दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार प्रमोद केंद्रे हे तपास करत आहेत.

# दागिने, मोबाइल घरातून चोरले



मीरा रोड : मीरा रोडच्या पेणकरपाडा येथील कक्कड पॅराडाईजमध्ये चौदाव्या मजल्यावर राहणारे सतीश रामरूप नाविक यांच्या घराचे दार सकाळी उघडे होते. दार उघडे पाहून अनोळखी चोरट्याने घरात प्रवेश केला व घरातील सोन्यांची चैन व अंगठी आणि चार मोबाइल असा ३३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी काशीमिरा पोलिस ठाण्यात ४ नोव्हेंबरच्या रात्री अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार स्वप्निल मोहिते चोरट्याचा शोध घेत आहेत.

लोकमत पृ.पा. १

# सासरी आला अन् दुचाकी गमावून बसला

## भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क



मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या इंद्रलोक फेझ-४ देवसृष्टी भागात राहणारे दीपककुमार सिन्हा हे ३ नोव्हेंबरच्या दुपारी दीड वाजता भाईंदर पश्चिमेच्या बालाजीनगरमधील तिरुपती दर्शन इमारतीत राहणाऱ्या सासरकडच्या लोकांना भेटण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी त्यांची दुचाकी तिरुपती दर्शन इमारतीच्या बाजूला असलेल्या संकुलाच्या समोर रस्त्यावर उभी केली होती. सायंकाळी सहाच्या सुमारास ते घरी जाण्यास निघाले असता दुचाकी जागेवर आढळून आली नाही.

वाहतूक पोलिसांनी टोईंग करून नेली असावी म्हणून वाहतूक पोलिसांकडे चौकशी केली; परंतु त्यांच्या दुचाकीवर पोलिसांनी कारवाई केली नसल्याचे आढळून आले. दुचाकी न सापडल्याने भाईंदर पोलिस ठाण्यात त्यांनी फिर्याद दिल्यावर ४ नोव्हेंबर रोजी पोलिसांनी ३० हजार रुपये किमतीच्या दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलिस हवालदार रामनाथ शिंदे तपास करीत आहेत.

# गल्ल्यावर मारला डल्ला

मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या न्यू गोल्डन नेस्ट येथील मीरा - भाईंदर महापालिकेच्या क्रीडा संकुलातील हॉटेलमध्ये काम करणाऱ्या रोखपालाने हॉटेलच्या गल्ल्यावर डल्ला मारत १ लाख १७ हजार ४०० रुपयांची रोकड चोरून नेली आहे. याप्रकरणी नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महापालिकेच्या क्रीडा संकुलात राजूस किचन हे हॉटेल चालवले जाते. या हॉटेलात गल्ल्यावर काम करणाऱ्या राजकुमार पटेल (रा. श्रीजी बिल्डिंग, भाईंदर पूर्व) याने हॉटेलच्या गल्ल्यात ठेवलेली रोकड चोरून नेली. हा प्रकार लक्षात आल्यानंतर हॉटेलच्या वतीने सौरभ उपाध्याय यांनी नवघर पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर ४ नोव्हेंबरच्या रात्री राजकुमार पटेलविरूद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार पठाण आरोपीचा शोध घेत आहेत.

लोकमत पृ.पा. २

# पोलिस आयुक्तालयात ३६ अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

## एका ठिकाणी वरिष्ठ पोलिस निरीक्षक; १४ ठाण्यांचे प्रभारी कोण?

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने केंद्रीय निवडणूक आयोगाच्या दट्ट्यानंतर मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयातील ३८ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या गेल्या. त्यानंतर ४ नोव्हेंबर रोजी ३६ अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचा आदेश जारी केला. तुळींज वगळता एकाही पोलिस ठाण्यात वरिष्ठ पोलिस निरीक्षक वा प्रभारी म्हणून उल्लेख नियुक्ती आदेशात नाही. त्यामुळे अशा नियुक्त्यांमागचे अर्थपूर्ण निकष काय? अशी चर्चा रंगली आहे.

मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयाने ३१ जुलैचा आदेश आणि २८ सप्टेंबरच्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशांना वेळीच गांभीर्याने घेतले नाही. त्यामुळे आयुक्तालयात ३ वर्षांपेक्षा जास्त काळ कार्यरत अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याऐवजी त्यांना पाठीशी घातल्याची चर्चा होऊ लागली. आयोगाच्या निर्देशानंतरही बदल्या केल्या गेल्या नसल्याचे वृत्त 'लोकमत'ने सर्वांत आधी दिले होते.

विशेष म्हणजे १५ ऑक्टोबरपासून आचारसंहिता सुरू झाल्यानंतर २३ ऑक्टोबर रोजी पोलिस आयुक्तालयाने बदलीस पात्र पोलिस अधिकाऱ्यांची यादी पोलिस महासंचालकांना सादर केली होती. विशेष पोलिस महानिरीक्षक के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना यांनी ३० ऑक्टोबर रोजी पोलिस निरीक्षक यांच्या बदलीचा आदेश जारी केला. त्यात मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयातील ३८ पोलिस निरीक्षकांचा समावेश होता.



▪ दिवाळीनंतर ४ नोव्हेंबर रोजी पोलिस उपायुक्त मुख्यालय सुहास बावचे यांनी ३५ पोलिस निरीक्षकांच्या आयुक्तालयातील विविध पोलिस ठाण्यांत ३४ पोलिस निरीक्षक व आर्थिक गुन्हे शाखेमध्ये एका पोलिस निरीक्षकाच्या नियुक्तीचे आदेश जारी केले, मात्र वरिष्ठ पोलिस निरीक्षक म्हणून केवळ तुळींज पोलिस ठाण्यात प्रमोद तावडे यांची नियुक्तीचा स्वतंत्र आदेश काढला आहे.

### नियुक्त्या तात्पुरत्या असल्याचे नमूद

वास्तविक १९ पैकी १५ पोलिस ठाण्यांतील प्रभारी वा वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्या बदल्या झाल्याने पोलिस ठाणे प्रभारी नेमणे आवश्यक होते. त्यामुळे तुळींज वगळता काशिमीरा, नयानगर, मीरा रोड, पेल्हार, मांडवी, माणिकपूर, विरार, नायगाव, काशिगाव, भाईंदर, वसई, वालिव, आचोळे, नालासोपारा या १४ पोलिस ठाण्यांत वरिष्ठ पोलिस निरीक्षक वा प्रभारी म्हणून नेमके कोणाला जबाबदारी दिली, याचा उल्लेखच नियुक्ती आदेशात केला गेलेला नाही. मुख्यालयातील उपायुक्तांच्या आदेशात या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या या तात्पुरत्या असल्याचे नमूद केले आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पा. ४

# रेल्वेत मराठी चालणार नाही, तिकीट तपासनिसाची दमदाटी

## मराठीचा आग्रह करणाऱ्या प्रवाशाला डांबले, तपासनीस निलंबित

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : रेल्वे स्थानकात प्रवाशाने तिकीट तपासणीसाला मराठी भाषेत बोलण्यास सांगितल्याने प्रवाशालाच डांबून रेल्वेत मराठी चालणार नाही म्हणत त्याच्याकडून माफीनामा लिहून घेतल्याचा प्रकार घडला. याप्रकरणी मराठी एकीकरण समिती आक्रमक झाल्यानंतर तिकीट तपासणीस रितेश मौर्याला निलंबित करण्यात आले.

रविवारी रात्री नऊच्या सुमारास एका मराठी भाषिक दाम्पत्याला नालासोपारा रेल्वे स्थानकात तिकीट तपासणीस रितेश मौर्या यांनी अडवून तिकीट विचारले. या दाम्पत्याने मौर्या यांना मराठीत बोला, असे सांगितले. त्यावरून मौर्या यांना राग आला आणि शाब्दिक बाचाबाची झाली. मौर्या यांनी या दाम्पत्याला थेट पोलिस ठाण्यात नेले आणि त्यांना दमदाटी करून माफीनामा देऊन घेतला.



मराठी एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी रात्री नालासोपारा स्थानकातील स्टेशन मास्तरच्या कार्यालयाला घेराव घालत जाब विचारला.

### रेल्वेकडूनही दिलगिरी व्यक्त

या प्रकारामुळे सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. पश्चिम रेल्वेनेही याप्रकरणी 'एक्स'वर (पूर्वीचे ट्विटर) दिलगिरी व्यक्त केली आहे. पश्चिम रेल्वे देशातील सर्व भाषा आणि आपल्या सर्व प्रवाशांचा सन्मान करते व विविधतेत एकतेवर विश्वास ठेवते. आमच्यासाठी सर्व धर्म, भाषा, प्रदेशातील प्रवासी समान आहेत. त्यांना उत्तम सेवा पुरविणे हेच आमचे ध्येय आहे. याबाबत चौकशी केली जाईल आणि दोषी आढळल्यास योग्य ती कारवाई केली जाईल, असे पश्चिम रेल्वेने या ट्वीटवर म्हटले आहे.

### मराठी एकीकरण समिती आक्रमक

- या प्रकाराची माहिती मराठी एकीकरण समितीला सोमवारी मिळाली. संतप्त झालेल्या एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी रात्री नालासोपारा स्थानकातील स्टेशन मास्तरच्या कार्यालयाला घेराव घालत जाब विचारला.
- अशा प्रकारे प्रवाशांना दमदाटी करून मराठी भाषेचा अनादर करणे चुकीचे आणि संतापजनक असल्याचे समितीच्या कार्यकर्त्यांनी सांगितले.
- महाराष्ट्रात राहून मराठी भाषेचा तिरस्कार करणे चुकीचे आहे. अशा प्रकारे मराठी भाषेची गळचेपी खपवून घेणार नाही, असे मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी सांगितले.

Scanned with OKEN Scanner

पुढारी पा. ९

# मिरा-भाईंदरमधील दुभाजकांची दैनावस्था

## जास्त रक्कम मोजूनही कामाचा बोजवारा; कामाबाबत संभ्रम कायम

**भाईंदर : राजू काळे**

मिरा-भाईंदर महापालिकेने दोन वर्षांकरीता शहरातील उद्याने, स्मशाने व दुभाजकांची निगा राखण्यासह त्यांची देखभाल करण्याकरीता सुमारे २८ कोटींचा ठेका दोन कंपन्यांना प्रभाग समिती निहाय विभागून दिला आहे. यापैकी मीरारोड येथील प्रभाग समिती क्रमांक ४, ५ व ६ मधील दुभाजकांची दैनावस्था झाल्याचे दिसून आले असून पालिकेने ठेकेदाराला जास्त रक्कम मोजूनही ठेकेदाराच्या कामाचा बोजवारा उडाल्याचे यावरून स्पष्ट झाले आहे.

पालिकेने प्रभाग समिती १ ते ६ मधील उद्याने, स्मशाने व दुभाजकांच्या देखभालीसह निगा राखण्याची सुमारे २८ कोटी ३६ लाखांची दोन वर्षांची निविदा मार्च २०२४ मध्ये काढली होती. त्याचा ठेका दोन कंपन्यांना प्रभाग समिती निहाय विभागून देण्यात आला. प्रभाग समिती क्रमांक १ ते ३ मधील उद्याने, स्मशाने व दुभाजकांची निगा राखण्याकरीता कंपनीला तर प्रभाग समिती ४ ते ६ मधील उद्याने, स्मशाने व दुभाजकांची निगा राखण्याकरीता कंपनीला नियुक्त करण्यात आले. कंपनीला देण्यात आलेली कामे मीरारोड मधील असून या कंपनीने आपल्या कामाचा बोजवारा कसा उडविला आहे, त्याची प्रचिती रस्त्यातील दुभाजक पाहून येऊ लागला आहे. कंपनीला देण्यात आलेल्या



● 'ड' वर्गातील पनवेल महापालिकेकडून प्रती चौरस मीटर क्षेत्रासाठी सुमारे ११ रुपये दर प्रती महिन्यासाठी निश्चित केला आहे. तर मिरा-भाईंदर महापालिकेने सुमारे १९९ रुपये इतका जास्त दर निश्चित केला आहे.

ठेकेदाराला दुभाजकांच्या देखभालीसाठी देण्यात आलेले क्षेत्र ९ हजार ९५० चौरस मीटर इतके असून पालिकेकडून प्रत्येक महिन्याला इतर महापालिकांच्या तुलनेत तब्बल १८ लाख ७० हजारांची रक्कम जास्त मोजली जात असल्याचे समोर आले आहे.

ठेक्यात इतर महापालिकांच्या तुलनेत मिरा-भाईंदर महापालिकेने जास्त रक्कम मोजली असतानाही ठेकेदाराने कामे इमाने ऐतबारे केली नसल्याचे दिसून आले आहे. मिरा-भाईंदर महापालिका 'ड' वर्गातील महापालिका असून याच वर्गातील इतर महापालिकांकडून दुभाजकांच्या देखभालीसाठी सुमारे ११ रुपये प्रती चौरस मीटर प्रमाणे दर मंजूर केल्याचे निदर्शनास आले असताना मिरा-भाईंदर महापालिकेकडून सुमारे १९९ रुपये इतका जास्त दर मंजूर केला आहे. या ठेकेदाराकडे दुभाजकांचे एकूण ९ हजार ९५० चौरस मीटर क्षेत्र देखभालीसाठी देण्यात आले आहे. या दुभाजकांमध्ये झाडे लावणे, त्यांची वेळोवेळी छाटणी करून त्यावर पाण्याची फवारणी करणे, झाडे लावण्यात आलेल्या ठिकाणची माती निश्चित कालावधीत खुरपणे, त्यात खत घालणे, मेलेल्या झाडांच्या जागी नवीन झाडे लावणे व त्यांना आकार देणे आदी कामांची जबाबदारी पालिकेकडून ठेकेदारावर निश्चित करण्यात आली आहे. मात्र या प्रभाग समिती अंतर्गत बहुतांशी दुभाजकांमध्ये ठेकेदाराकडून झाडे लावण्यात आली नसून त्याची निगा न राखल्याने बहुतांशी झाडे गायब तर लावण्यात आलेल्या झाडांना पाणी न दिल्याने अनेक झाडे मेल्याचे दिसून आले आहे. यामुळे संभ्रम निर्माण झाला आहे.

पुढारी पु. पा. ४

## जुगार खेळणाऱ्या सात जणांवर कारवाई

**मिरारोड :** भाईंदर पूर्वेला एका ठिकाणी जुगार खेळताना नवघर पोलिसांनी धाड टाकून सात जणांवर कारवाई केली आहे. यात जुगार खेळण्यासाठी लागणारे साहित्य व रक्कम भाईंदरमधील पत्रा शेडमध्ये बेकायदा रित्या जुगार चालू असल्याची माहिती नवघर पोलिसांना मिळाली होती, त्यानुसार सापळा रचून पोलिसांनी जुगार खेळणाऱ्या नवाब कमालुद्दीन अहमद (३०), सुनिल सोहनलाल गुप्ता (३४), नादीर दिलदार खान (२४), इर्शादउल्ला हिदायदउल्ला खान (४२), शहजाद कमालिद्दीन खान (२६), जयकरण सोहनलाल गुप्ता (२५) आणि सय्यद नजमुल हसन (४५), सर्व भाईंदर पुर्व येथील राहणारे आहेत. त्यांच्यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक धीरज कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने कारवाई करत ६५०० रुपये रोख व मुद्देमाल जप्त केला.

Scanned with OKEN Scanner

(पुण्यनगरी पा. ८)

# संसदेचे हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबरपासून सुरू होणार

## महागाई, भ्रष्टाचारावरून विरोधक आक्रमक पवित्रा घेणार

। नवी दिल्ली : संसदेचे हिवाळी अधिवेशन येत्या २५ नोव्हेंबरपासून सुरू होणार असून, ते २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे, अशी माहिती संसदीय कामकाजमंत्री किरण रिजिजू यांनी मंगळवारी ट्विटरवरून दिली. महाराष्ट्र व झारखंड विधानसभा तसेच विविध पोटनिवडणुकांचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर होणार आहे. त्यानंतर दोन दिवसांनी हिवाळी अधिवेशन भरणार आहे. यात महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारी, रेल्वे अपघात, वक्फ विधेयक, नैसर्गिक आपत्ती यासह अनेक मुद्द्यांवरून विरोधक सरकारला कोंडीत धरण्याच्या तयारीत आहेत.

केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरण रिजिजू ट्विटरवरून म्हणाले की, माननीय राष्ट्रपती



द्रौपदी मुर्मू यांनी भारत सरकारच्या शिफारशीवरून २५ नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२४ या दरम्यान संसदेचे हिवाळी अधिवेशन घेण्यास मंजुरी दिली आहे. या संबंधित प्रस्तावावर राष्ट्रपतींनी मोहोर उमटवली आहे. देशाने संविधान स्वीकार करण्यास २६ नोव्हेंबर २०२४ रोजी ७५ वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्ताने २६ नोव्हेंबर रोजी संविधान सदनातील (जुनी संसद) केंद्रीय कक्षात जल्लोष साजरा करण्यात येणार आहे, असे रिजिजू यांनी सांगितले. यंदाच्या अधिवेशनात विरोधक जनतेच्या विविध मुद्द्यांवरून आक्रमक पवित्रा घेण्याची शक्यता आहे. प्रामुख्याने महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारी, रेल्वे अपघात, वक्फ विधेयक, केरळमधील नैसर्गिक आपत्ती यासह अनेक मुद्द्यांवरून विरोधक सरकारला धारेवर धरण्याच्या तयारीत आहेत. विशेष बाब अशी की, २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताने संविधान अंगीकारले होते. त्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी त्याची अंमलबजावणी सुरू झाली. म्हणून २६ नोव्हेंबर हा राष्ट्रीय विधि दिवस म्हणून साजरा केला जातो. मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर २०१५ मध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मोदी सरकारने २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली.

(लोकसत्ता प्र. पा. १)

# बेकायदा मद्य विक्री रोखण्यासाठी भरारी पथके

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरात होणारी बेकायदा मद्यतस्करी रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग सज्ज झाला आहे. महामार्गावर भरारी पथके तैनात केली आहेत.

राज्यात २० नोव्हेंबर रोजी विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. या काळात मोठ्या प्रमाणावर मद्याचा वापर होत असतो. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे कारवाई केली जाणार आहे. मद्याची तस्करी आणि बेकायदा मद्य विक्री रोखण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र आणि गुजरात राज्याच्या सीमेवर महाराष्ट्र पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग यांची भरारी पथके तैनात ठेवण्यात आली आहेत. मुंबई-अहमदाबाद महामार्गावरून मद्याची तस्करी होत असते. महाराष्ट्रात दमणमार्गे मद्याचा पुरवठा सुरू होण्याची शक्यता लक्षात घेता महामार्गावर विशेष कारवाई केली जाणार आहे.

### तीन दिवस मद्यबंदी

राज्यात १८ नोव्हेंबरला सायंकाळी सहा वाजल्यापासून २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ड्राय डे घोषित करण्यात आला आहे. तशा सूचना राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून संबंधित दुकानदारांना देण्यात आल्या आहेत. मद्य विक्री बंदी वाईन शॉप, बार ॲण्ड रेस्टॉरंट, देशी दारू विक्रीची दुकाने, बीअर शॉप आणि ताडी-माडी विक्री केंद्रे यांना लागू असणार आहे.
निवडणुकीच्या काळात, मतदानाच्या दिवशी मतदारांना मद्य पुरवून फितवू नये, असा या बंदीमागील हेतू आहे.

Scanned with OKEN Scanner

( पुण्यनगरी पा. ७

# वसईतून ९ पिस्तुल, २१ काडतुसे हस्तगत

। वसई : वसईतून एका व्यक्तीला ताब्यात घेत त्याच्याकडून ९ पिस्तुल आणि २१ जिवंत काडतुसे हस्तगत करण्याची कामगिरी गुन्हे शाखा कक्ष -२ ने केली आहे. वसई कोळीवाडा ते सुरुची बागेकडे जाणाऱ्या रोडवरील सनटेक सिटी समोरील अर्धवट बांधकामाच्या तीन मजली बिल्डिंग जवळ मोईन उर्फ जिलेबी अब्बुबयान सैय्यद हा देशी बनावटीची पिस्तुल आणि जिवंत काडतुसे बाळगून असल्याची माहिती पोलीस हवालदार एकनाथ गोवारी यांना मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखा कक्ष-२ ने गुन्हा दाखल करत तात्काळ सदर ठिकाणी सापळा रचून सैय्यद याला ताब्यात घेतले. नंतर त्याची कसून चौकशी केली. तेव्हा त्याने पिस्तुल खरेदी करणारे आणि पुरवणाऱ्या साथीदारांची नावे उघड केली.



त्यानुसार जावेद इकबाल खानला वसई कोळीवाडा, मोहम्मद आरीफ ऊर्फ शाहरुख युसुफ खान याला ट्रॉम्बे, मुंबई, अंकित रामनुजारय निशाद उर्फ अंकित पटेल, अमित विजय निशाद आणि अजयकुमार प्रजापती यांना उत्तर प्रदेश, अमितकुमार निशाद याला बदलापूर, आलम उर्फ अलीम झुलकरनैन खान याला कुर्ल्यातून ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून ३ लाख ८३ हजार ३०० रुपये किमतीची ९ देशी पिस्तुल,२१ जिवंत काडतुसे, मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा -२ युनिटचे पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास कांबळे, उपनिरीक्षक सागर शिंदे, अजित गिते, सहाय्यक फौजदार रमेश भोसले, संजय नवले, हवालदार रविंद्र पवार, प्रफुल्लता पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, दादा आडके, सुधीर नरळे, अमोल कोरे, प्रशांतकुमार ठाकुर, अजित मैड, प्रतिक गोडगे, राजकुमार गायकवाड, रामेश्वर केकान, अविनाश चौधरी, शुभम गायकवाड, संतोष चव्हाण यांनी ही कामगिरी केली.

# वळणावर बस-रिक्षाची टक्कर, एकाचा मृत्यू

## तिघे गंभीर जखमी

। मीरा रोड - भाईंदर पश्चिमेच्या डोंगरी बस स्टॉपच्या वळणावर महापालिका परिवहन बस व रिक्षाची समोरासमोर टक्कर झाल्याची घटना सोमवारी घडली आहे. अपघातात रिक्षाचालकाच्या भावाचा मृत्यू तर रिक्षा चालकासह पत्नी व ४ वर्षीय मुलगी गंभीर जखमी झाले असून, कोमात गेले आहेत. याप्रकरणी उत्तन सागरी पोलिसांनी बसचालकाला ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदर पश्चिमेला राहणारा रिक्षाचालक बाला राजभर (३०) रिक्षामधून सोमवारी रात्री १.३०च्या सुमारास भाऊ पंकज (१८), पत्नी अनिता (२८) व मुलगी अनिषा (४) यांना मुर्धा गाव येथून चौक येथील घरी घेऊन जात होता. त्यावेळी डोंगरी बस स्टॉपच्या वळणावर उत्तन येथून भाईंदरकडे जाणाऱ्या महापालिकेच्या परिवहन बस व रिक्षाची समोरासमोर टक्कर झाली. या अपघातात रिक्षातील सर्वजण गंभीर जखमी झाले. जखमींना भाईंदरच्या जोशी रुग्णालयात उपचारासाठी आणले असता, डॉक्टरांनी त्यांना दाखल करून न घेता कांदिवलीच्या शताब्दी रुग्णालयात जाण्यास सांगितले. यावेळी जखमींना शताब्दी रुग्णालयात जाण्यासाठी रुग्णालयाने चालक नसल्याचे कारण देत रुग्णवाहिकासुद्धा उपलब्ध करून दिली नाही, असा आरोप जखमींच्या नातेवाईकांनी केला आहे.

यानंतर जखमींना मिळेल त्या वाहनाने शताब्दी रुग्णालयात नेत असताना पंकजचा रस्त्यातच मृत्यू झाला. तर रिक्षाचालक बाला, त्याची पत्नी अनिता व मुलगी अनिषा कोमात गेल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. बस चालकाचे नाव मढीवालर (२५) असे असून, त्याने यापूर्वी देखील एका रिक्षाला ठोकर दिली होती. त्या अपघातात रिक्षातील तीन जणांचा जागीच मृत्यू झाला होता. यावेळी त्याला परिवहन विभागाने २ महिने निलंबित करून पुन्हा कामावर घेतले. यानंतर सोमवारी पुन्हा झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाल्याची झाल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर उत्तन सागरी पोलिसांनी बस चालकावर गुन्हा दाखल केला असून, बसचालकाला ताब्यात घेतले आहे. रिक्षा चालकाने सायंकाळी ५ वाजता भाईंदर पोलीस ठाण्यात धडक देत सहाय्यक पोलीस आयुक्तांची भेट घेतली. सहाय्यक पोलीस आयुक्तांनी बसचालकावर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

Scanned with OKEN Scanner

NBT पा: 9

# 3 महीने में 8 गिरफ्तार, 9 पिस्टल बरामद

## यूपी के डॉन मुख्तार का बॉडीगार्ड करता था मुंबई में हथियार सप्लाई



**क्राइम ब्रांच यूनिट 2 को मिली बड़ी सफलता**

■ निसं, नालासोपारा : मीरा भाईंदर-वसई विरार पुलिस आयुक्तालय के क्राइम ब्रांच यूनिट ने तीन महीने की कड़ी मेहनत से आठ आरोपियो को गिरफ्तार किया है। वही, उनके पास से 9 पिस्टल, 21 कारतूस और 5 मोबाइल बरामद किए है। यह कार्रवाई सीनियर पीआई शाहूराज रनवरे के मार्गदर्शन मे हुई। पुलिस के मुताबिक यूपी के डॉन मुख्तार अंसारी का बॉडीगार्ड यूपी से मुंबई और वसई-विरार में हथियार सप्लाई कराता था। फिलहाल वह वांटेड है।

क्राइम ब्रांच के एसीपी मदन बल्लाल ने बताया कि 23 जुलाई को सूचना मिलने पर मोईन उर्फ जलेबी अब्बुब यान सैयद (30) को हिरासत मे लेकर, उससे एक देशी पिस्टल और तीन कारतूस बरामद किए गए थे। उसने बताया कि वह पिस्टल उसे मुंबई मे रहने वाले एक शख्स ने दी थी। इस तरह क्राइम ब्रांच ने एक-एक करके गुजरात, पंजाब और यूपी के अलग-अलग जिलो से आठ आरोपियो जावेद इकबाल खान, मोहम्मद आरिफ उर्फ शाहरुख यूसुफ खान, अंकित रामभुजारथ निषाद उर्फ अंकित पटेल, अमित विजय निषाद अमित कुमार महाजन निषाद, आलम उर्फ अलीम झुलकरनैन खान और देवा अजय कुमार प्रजापति को गिरफ्तार किया है। बल्लाल ने बताया कि गिरफ्तार आरोपी मैकेनिक है और गैरेज मे काम करते है। यह लोग हथियारो की डिलीवरी का काम करते थे। बल्लाल ने बताया कि मास्टरमाइंड यूपी के मृतक डॉन मुख्तार अंसारी का बॉडीगार्ड मोनू उर्फ कलीम यासीन अहमद है, जो फिलहाल वांटेड है।

# वसई-विरार में खूब बिक रही प्रतिबंधित पॉलिथीन



**नायगांव और नालासोपारा के बाजारों में धड़ल्ले से बिक्री**

■ निसं, वसई : सिंगल यूज पॉलिथीन पर केंद्र और राज्य सरकार के प्रतिबंध वसई-विरार मे बेअसर दिखाई दे रहा है। मनपा की ओर से इस पर कोई ठोस कदम नही उठाने से यहां के नायगांव, वसई, नालासोपारा और विरार मे हर बाजार और दुकान मे सिंगल यूज पॉलिथीन की थैलियां खुलेआम बेची जा रही है। शुरुआती दिनो मे प्रतिबंध लगाए जाने का असर दिखा था और बाजारो मे इस्तेमाल होने वाली पॉलिथीन की बिक्री को लेकर कार्रवाई हुई थी, लेकिन इसमे अब सुस्ती आ गई है। मनपा के स्वच्छता विभाग की ओर से पॉलिथीन और सिंगल यूज प्लास्टिक की बिक्री-इस्तेमाल पर रोक के लिए ठोस कदम नही उठाए जा रहे है। अब भी शहर मे पॉलिथीन और सिंगल यूज प्लास्टिक का इस्तेमाल धड़ल्ले से हो रहा है।

> सिंगल यूज प्लास्टिक पर कार्रवाई जारी है, लेकिन शहर मे लाखो अवैध फेरीवालो पर कार्रवाई करना एक बड़ी चुनौती है।
>
> – सुखदेव दरवेशी, सहायक आयुक्त, स्वच्छता विभाग, वीवीएमसी

### कई जगहो पर लगे ढेर

फुटपाथों से लेकर बड़ी दुकानो मे इसकी खूब बिक्री हो रही है। नतीजतन गलियो, सड़को और नालियो मे पॉलिथीन और प्लास्टिक के ढेर लगे हुए है। नालियो मे पॉलिथीन के अटकने के कारण सही ढंग से जल-निकासी नही होती है। नागरिकों का कहना है कि मनपा दिखावटी कार्रवाई करती है। कार्रवाई के दूसरे दिन ही बाजारो मे खुलेआम सिंगल यूज प्लास्टिक की थैलियां बेची जाती है।

Scanned with OKEN Scanner

# आठ महीने में भी नहीं बना 50 मीटर का गटर!

■ सुरेंद्र नेगी, नालासोपारा: वसई-विरार मनपा प्रशासन और जनप्रतिनिधियों की अनदेखी से शहर का विकास प्रभावित हो रहा है। कई अधूरे विकास कार्य आम जनता के लिए परेशानी का सबब बन गए है और जानलेवा साबित हो रहे है। हैरत की बात यह है कि आठ महीने पहले शुरू किया गया 50 मीटर का गटर कार्य अब तक पूरा नही हो पाया है।

मनपा की उदासीनता और जनप्रतिनिधियों की अनदेखी से विकास कार्य

**खुली गटर से हादसा होने का डर:** जानकारी के मुताबिक, आचोले प्रभाग डी कार्यालय के पास आठ महीने पहले गटर बनाने का काम शुरू किया गया था। सड़क किनारे गटर बनाने का काम आज भी अधूरा पड़ा हुआ है। इससे स्थानीय लोगों की परेशानी बढ़ गई है। खुले गटर के पास से रोजाना लोगों की आवाजाही रहती है। यहां से सैकड़ों बच्चे भी स्कूल आते-जाते है। रात के समय अंधेरा होने की वजह से खुली गटर के पास हादसे का डर बना रहता है। बीजेपी के पूर्व नगरसेवक ने आरोप लगाया कि सार्वजनिक निर्माण विभाग व ठेकेदार इसके लिए जिम्मेदार है। एक महीने में पूरा होने वाला यह कार्य आठ महीने बाद भी पूरा नही हो पाया है। मनपा का कहना है कि गटर में ही बिजली का पोल है, जिसकी वजह से कार्य में देरी हुई है।

**अधिकारी नही दे रहे ध्यान:** बता दें कि प्रभाग डी कार्यालय के अंतर्गत आचोले पुलिस स्टेशन के पास गटर व ड्रेनेज की सुविधा नहीं थी। पूरे क्षेत्र में नालियों व शौचालय का गंदा पानी सड़कों पर बहता था। गंदे व दुर्गंध वाले पानी से लोगों के स्वास्थ्य पर बुरा असर पड़ रहा था। स्थानीय लोगों के साथ ही पुलिस विभाग की ओर से मनपा प्रशासन को कई बार पत्र भी दिया गया, लेकिन अधिकारियों पर इसका कोई असर नहीं पड़ा।





**खबर का लिया संज्ञान**

गटर व गंदगी की इस समस्या को लेकर एनबीटी ने पिछले दिनों एक खबर प्रकाशित की थी। इस खबर का संज्ञान लेते हुए मनपा प्रशासन ने इस समस्या को दूर करने के लिए परिसर में गटर बनाने का प्रस्ताव मंजूर किया था। मार्च 2024 में इसके लिए बजट राशि भी उपलब्ध कराया गया और गटर बनाने का कार्य भी शुरू हुआ। आठ महीने बीत जाने के बाद यह कार्य अब तक पूरा नहीं हो पाया है।

**प्रशासन का कहना है:** मनपा प्रशासन का कहना है कि गटर निर्माण के दौरान बिजली के दो पोल बाधा बन गए है। बिजली विभाग को पत्र देकर इस पोल को हटाने को कहा गया था, लेकिन विभाग की ओर से अनदेखी की जा रही है। हालांकि अब बिजली विभाग ने उस पोल को हटा दिया है। इसके बाद गटर निर्माण का कार्य फिर से शुरू हुआ है। सूत्रों के मुताबिक प्रशासन ने कार्य शुरू करने का निर्देश दिया है, लेकिन ठेकेदार द्वारा लापरवाही बरती जा रही है। कार्य काफी धीमी गति से हो रहा है।

Scanned with OKEN Scanner

The India Express

{ PHONE TAPPING ALLEGATIONS }

# DGP Shukla out after EC steps in

Yogesh Naik

yogesh.naik@hindustantimes.com

**MUMBAI:** The Election Commission of India (ECI) removed the director general of police (DGP) Rashmi Shukla on Monday from her current post, acting on complaints from the Congress and NCP (SP) of phone tapping – a controversy Shukla courted in the past as well. Last week, ECI had sent a warning to Shukla following similar complaints from Shiv Sena (UBT).

On ECI's insistence, the chief secretary of Maharashtra, Sujata Saunik, suggested names of three IPS officers, one of who will take on the additional charge of DGP for the duration of the assembly elections to be held on November 20.

They include senior IPS officers such as Mumbai police commissioner Vivek Phansalkar, DG (legal and technical) Sanjay Verma and home guard chief Ritesh Kumar.

A top IAS officer told HT that though ECI had asked for Shukla's removal, the state had only sent her on leave.

Shukla did not respond to HT's calls for a comment on the issue. Likewise, reserving comment on the DGP's transfer, deputy chief minister Devendra Fadnavis, said: "While I do not wish to speak on ECI's orders, I hope Congress, NCP (SP) and Shiv Sena (UBT), who have prised the ECI, will not blame the poll body if the Mahayuti returns to power. The opposition had blamed ECI for their defeat in Haryana."

Over the last five years, the 1988-batch officer has found herself in many political wrangles.

When Fadnavis was the chief minister between 2014-19, Shukla served as the commissioner of the State Intelligence Department (SID), a sensitive position marked for those close to people in power.

However, when the Maha Vikas Aghadi (MVA) came to power in 2019 she was shunted along with many top officers. She was moved from SID to civil defence, a non-executive posting. She was posted as the additional director general of the Central Reserve Police Force (CRPF), followed by the head of Sashastra Seema Bal.



Rashmi Shukla HT ARCHIVES

After Shukla exited the state, three FIRs from Pune and Mumbai were registered against her in 2022 by the state, based on allegations of phone tapping by opposition leaders such as Sena (UBT) MP Sanjay Raut and NCP's Eknath Khadse. They said Shukla was purportedly egged on by the BJP.

Last week, state Congress chief Nana Patole and Sena (UBT)'s Raut levelled similar allegations against her.

On Friday, HT had reported that chief election commissioner Rajiv Kumar expressed concern over "politically motivated crimes in Maharashtra".

After the ECI's move on Monday, state Congress chief Nana Patole said, "We are thankful, but why did it take so long, when the DGP in Jharkhand was removed immediately." He added: "Despite controversies, Devendra Fadnavis and Eknath Shinde illegally extended her term for their benefit."

BJP chief Ashish Shelar, retorted: "We will lodge a complaint with ECI against Patole for his baseless allegations against Devendra Fadnavis."

# TTE suspended after he makes passenger write apology letter for asking him to speak in Marathi

PRESS TRUST OF INDIA
MUMBAI, NOVEMBER 5

THE WESTERN Railway has suspended a train ticket examiner (TTE) for allegedly making a passenger write an apology after the latter asked him to speak in Marathi, an official said on Tuesday.

The action came after a photograph of the apology letter surfaced on social media, and passengers staged a protest, he said.

Talking to PTI, Vineet Abhishek, chief public relations officer of Western Railway, said an inquiry is ordered into the incident that took place at Nallasopara station on November 3, and TTE Rakesh Mourya has been suspended.

"All passengers, regardless of their religion, language, or region, are equal to us. Providing excellent service to them is our goal. The matter will be investigated thoroughly, and necessary action will be taken," he said.

Around 70 to 80 passengers staged a protest at Nallasopara station after the purported apology letter surfaced on social media on Monday, officials said.

According to officials, the TTE asked the passenger, Amit Patil, and his wife to furnish their local train tickets. The couple asked him to speak to them in Marathi as they did not understand Hindi, and an argument ensued.

The TTE took the couple to the office of the Railway Protection Force, where Patil claimed that the official had threatened them and made him write an apology, they said.

The Western Railway, in its statement, affirmed its commitment to respecting all languages and passengers.

"Western Railway respects all languages spoken across the country and values the diversity of our passengers, standing firm on unity in diversity," it stated.

Scanned with OKEN Scanner

Mid-day

# ECI appoints Sanjay Kumar Verma as state's new DGP

## Move follows the removal of DG Rashmi Shukla who has been placed on compulsory leave by the Election Commission



Sanjay Kumar Verma was previously holding charge as DG, legal and technical

**FAIZAN KHAN**
faizan.khan@mid-day.com

FOLLOWING the unexpected removal of Maharashtra's first woman Director General of Police (DGP), Rashmi Shukla, by the Election Commission of India (ECI), the latter has appointed 1990-batch IPS officer Sanjay Kumar Verma as the new DGP of the Maharashtra Police.

In a letter to the state chief secretary, ECI Secretary S K Das stated, "I am directed to convey that the commission has considered the panel and approved the name of Shri Sanjay Kumar Verma, IPS (MH:1990), for posting as DGP Maharashtra."

However, it remains unclear whether Verma's appointment is only for the duration of the elections in Maharashtra or if he will continue in the role afterward. Sources indicate that the final decision will rest with the new government, which will determine whether to reinstate Shukla or allow Verma to continue. Shukla has been placed on compulsory leave by the ECI.

**1990** IPS batch Sanjay Verma was part of

Verma, a 1990-batch IPS officer from Uttar Pradesh, holds a degree in Mechanical Engineering. He was serving as the DGP of Legal and Technical for the state police before this appointment. Verma has also held the position of Inspector General (IG) of the Kolhapur range and served as Chief Vigilance Officer (CVO) of the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) during Devendra Fadnavis's tenure as chief minister, holding that post for four years.

Shukla's removal followed complaints from opposition leaders led by Maharashtra Congress President Nana Patole, who accused her of being biased toward the ruling Mahayuti alliance and acting as a BJP campaigner. Verma who took charge on Tuesday evening said, "First of all, I would like to thank the Election Commission for entrusting me with such a significant responsibility. Conducting free and fair elections is our duty, and we will ensure everything is done impartially. The police must also act with complete neutrality so that no one has any reason to raise questions."

Scanned with OKEN Scanner

# State DGPs – birds of passage

## Sanjay Verma is asked to take over from Rashmi Shukla but there is a twist in the tale...

**Ravikiran Deshmukh**
MUMBAI

It is a game of musical chairs at Maharashtra's police headquarters as Sanjay Kumar Verma steps in as replacement for Rashmi Shukla as Director General of Police – albeit with a timer ticking until the assembly polls wrap up.

Rashmi Shukla has been sent on an impromptu "forced leave," and the fine print of the order seems to suggest that she could return once the election dust settles.

The state home department's order is clear: Verma is a temporary fix, an interim head to steady the ship just long enough to keep the Election Commission (ECI) content. And it's the ECI that stirred this pot, asking for three top IPS officers to be considered for the post, with Verma ultimately winning the EC's nod.



Notably, Verma's still has four years to go before retirement in April 2028 — a fact some thought would entail a longer term as State DGP. But in Maharashtra's power corridors, few things are set in stone.

Meanwhile, backers of Shukla are left scratching their heads. The no-nonsense officer's fans insist she was edged out unfairly, with Congress calling for her exit but offering no proof of bias.

On the other side of the political spectrum, former Mumbai Commissioner Satyapal Singh dubbed the move to sideline her as "unfortunate."

▸ Continued on | P22

# Hindi chauvinism: TTE suspended

**FPJ News Service**
MUMBAI

**Passenger forced to write an apology after he told TTE to speak in Marathi**

The Western Railway has suspended a train ticket examiner (TTE) for allegedly making a passenger write an apology after the passenger asked him to speak in Marathi since he couldn't understand Hindi, an official said on Tuesday. The Vasai GRP (Government Railway Police) has also registered an FIR under the relevant sections of Bhartiya Nyay Sanhita and further investigation is on.

The action came after a photograph of the apology letter surfaced on social media, and passengers staged a protest, he said. An inquiry has been ordered into the incident which occurred at Nallasopara station on November 3, and TTE ( travelling ticket examiner) Rakesh Mourya has been suspended.

The TTE had asked the passenger, Amit Patil, and his wife to furnish their local train tickets. The couple asked him to speak to them in Marathi as they did not understand Hindi, and an argument ensued.

The TTE took the couple to the office of the Railway Protection Force, where Patil claimed that the official had threatened them and made him write an apology.

According to a statement released by the Marathi Ekikaran Samiti, the couple was also forced to write on a piece of paper that they would never ask that they be spoken to in Marathi. The wife had recorded the incident on her phone, however she was forced to delete it. The couple was made by the RPF to sit in the office for long time.

▸ Continued on | P22

Scanned with OKEN Scanner